वर्ष- १२ ■ अंक- १६ ■ मुंबई, मंगळवार,३ मार्च २०२६ ते ९ मार्च २०२६ ■ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

PG|2

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

● संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

मानेचा मसाज जीवघेणा ठरू शकतो

3 → आर्थिक विश्वासार्हतेचा पाया

पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई... तस्करांच्या मुसक्या आवळल्या, ← 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

संशयास्पद इंजेक्शन आणि बरंच काही!

गोरगरीब महिलांना पैशांचं आमिष दाखवून अंडाशयाची तस्करी



बदलापूर, बदलापूर पुन्हा एकदा हादरलं आहे. चिमुरडी अत्याचार प्रकरणानंतर आणखी एक धक्कादायक व तितकाच संतापजनक प्रकार बदलापूरमध्ये समोर आला आहे. मानवी तस्करीचे खळबळजनक प्रकार आजवर अनेकदा उघडकीस आले आहेत. दर दिवशी गुन्हेगारीचं एक नवं कृत्य विचार करायचा भाग पाडत असताना आणि डोक्याचा झिणझिण्या आत असतानाच आता आणखी एका प्रकरणानं नागरिकांसह पोलीस यंत्रणेलाही धक्का दिला आहे. कारण ठरतंय ते म्हणजे बदलापूर इथं सुरू असणारं अंडाशयाच्या तस्करीचं रॅकेट.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी वेगानं तपासाची चक्रं फिरवली. यानंतर पोलिसांनी केलेल्या कारवाईत ज्युवेली गावात राहणाऱ्या सुलक्षणा गाडेकर, उल्हासनगरमधील साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे अशा तिघींनाही बेड्या ठोकल्या आहेत.

त्यांच्याकडून बदलापूर पोलिसांनी आरोपी सुलक्षणा गाडेकरच्या घरी छापेमारीची कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी महिलांच्या गर्भाशयासाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शन्सचे फोटो, सोनोग्राफीचे फोटो, खोटी प्रतिज्ञापत्रं, महिलांचे फोटो आणि इतर संशयास्पद कागदपत्रे जप्त केली आहेत.

पोलिसांनी अटक केलेल्या सुलक्षणा गाडेकर, उल्हासनगरमधील साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे यांसह सर्व आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्यांना २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणी पोलिसांचा तपास सुरू असून यात आणखी काही धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता आहे.

संबंधित महिला आरोपी सुलक्षणा गाडेकर ही गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून इंजेक्शन्स देत होती. महत्त्वाची बाब म्हणजे ती डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बेकायदेशीरपणे महिलांची सोनोग्राफीही करवून घेत होती. गर्भाशयात स्त्री बिजाची वाढ झाल्यानंतर या महिलांना गाडेकर ही आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवण्यात येत होतं. त्याठिकाणी ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन गर्भाशयातील अंडाशय काढण्यात येत होतं.

३०० पीडित महिला, एका अंडाशयामागे २० हजार रुपये


बदलापूर तस्करी प्रकरणात धक्कादायक माहिती उघड

बदलापुरातील अंडाशय तस्करी प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. या प्रकरणात आंतरराज्यीय रॅकेट असल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या अंडाशय तस्करी प्रकरणातील मुख्य आरोपी सुलक्षणा गाडेकरला पोलिसांनी अटक केली आहे. ही महिला बदलापूरमधील गोरगरिब महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांचे अंडाशय विकण्यास भाग पाडत होती. या प्रकरणात पोलिसांनी सुलक्षणा गाडेकरसह उल्हासनगरातील तिची साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे या ३ महिलांना अटक केली. याप्रकरणाच्या तपासातून एकएक धक्कादायक माहिती उघड होताना दिसत आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार या प्रकरणात ३०० हून अधिक महिला पीडित आहे. या सर्व महिलांना अंडाशयामागे २० हजार रुपये दिले जात होते. तर मध्यस्थ महिलांना प्रत्येकी ३ हजार रुपये देण्यात येत होते अशी उघड झाली आहे. या अंडाशयांची केरळ, तामिळनाडू, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये विक्री केली जात होती. पोलिसांनी मात्र या संपूर्ण तस्करी प्रकरणाबद्दल काहीही बोलण्यास नकार दिलाय. या अंडाशय तस्करी प्रकरणात अटक करण्यात आलेली मुख्य सूत्रधार सुलक्षणा गाडेकर ही बदलापुरातल्या खरवईतील नॅनो सिटीत राहत होती.



कसा उघडकीस आला हा प्रकार?

बदलापूरमधील एका पीडित महिलेनं उपजिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांशी संपर्क साधल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर रुग्णालयातील डॉक्टरांनी बदलापूर पूर्व आणि पश्चिम या दोन्ही पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार दाखल केली. पोलिसांनी तपासाची चक्रं फिरवल्यानंतर ज्युवेली गावात राहणाऱ्या सुलक्षणा गाडेकर आणि तिची उल्हासनगरातील साथीदार अश्विनी चाबुकस्वार, मंजुषा वानखेडे अशा तिघांनाही पोलिसांनी अटक केली. अटक करण्यात आलेल्या या सर्वांना २५ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली. बदलापूरच्या ज्युवेली गावातील नॅनो सिटी इथं सुलक्षणा गाडेकर ही महिला राहत असून, तिने गर्भाशयात स्त्री बीजाची वाढ होण्यासाठी लागणारे इंजेक्शन्स घरातच साठवले होते. गरजू महिलांना पैशांचं आमिष दाखवून ती हे इंजेक्शन देत होती. तसंच डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय बेकायदेशीरपणे सोनोग्राफी देखील करवून घ्यायची. गर्भाशयात स्त्री बिजाची वाढ झाल्यानंतर अशा महिलांना गाडेकर ही आयव्हीएफ सेंटरमध्ये पाठवायची. तिथं ऑपरेशन थिएटरमध्ये नेऊन गर्भाशयातील अंडाशय काढलं जायचं. महिलांच्या शरीरातून काढण्यात आलेल्या या अंडाशयाची त्यानंतर सर्रासपणे विक्री करण्यात येत होती. पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा छडा लावून सुलक्षणा गाडेकर हिच्यासह तिचे साथीदार अश्विनी चाबूकस्वार, मंजुषा वानखेडे यांना ताब्यात घेतलं आहे. पोलिसांनी गाडेकरच्या घरी धाड टाकून गर्भाशयासाठी वापरण्यात येणाऱ्या इंजेक्शनचे फोटो, सोनोग्राफीचे फोटो, खोटी प्रतिज्ञापत्रं, महिलांचे फोटो आणि इतर संशयास्पद कागदपत्रे जप्त केली असून आता या तस्करीमध्ये नेमकं आणखी कोण सामील आहे याचाच शोध घेतला जात आहे.



नागपुरात १२ वीचा केमिस्ट्री पेपर लीक!

विद्यार्थिनीच्या वारंवार वॉशरूमला जाण्यामुळे आली शंका... मोबाईलमध्ये सापडला पुरावा

नागपुर। नागपुरात बारावीच्या केमिस्ट्री विषयाची प्रश्नपत्रिका व्हॉट्सॲपवर लीक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी तपास सुरू केला असून, विद्यार्थिनीचा मोबाईल जप्त करण्यात आला, अशी माहिती मिळाली. परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका आणि संभाव्य उत्तरे सोशल मीडियावर फिरत असल्याचे प्राथमिक तपासात स्पष्ट झाले आहे.

गुन्हा नोंद आणि डिजिटल तपास

सदर प्रकरणी संबंधित पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून व्हॉट्सॲप ग्रुप, मोबाईल फोन आणि डिजिटल पुरावे तपासले जात आहेत.



पोलिसांचा सखोल तपास सुरू असून, पेपर नेमका कुठून लीक झाला आणि यात आणखी कोणाचा सहभाग आहे, याचा शोध घेतला जात आहे.

पालक आणि विद्यार्थी प्रतिक्रिया

परीक्षेदरम्यान अशा प्रकारचे गैरवर्तन उघडकीस आल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत आहे. शैक्षणिक अधिकाऱ्यांनी नियम पाळण्याचे आणि परीक्षा केंद्रात नीतीमान वर्तणूक राखण्याचे आवाहन केले आहे.

नेमके काय घडले?

पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, बुधवारी एका परीक्षा केंद्रावर १२ वीची केमिस्ट्रीची लेखी परीक्षा सुरू असताना एका विद्यार्थिनीवर पर्यवेक्षकांना संशय आला. ती वारंवार स्वच्छतागृहात जात असल्याने तिची तपासणी करण्यात आली, त्यावेळी तिच्याकडून मोबाइल फोन जप्त करण्यात आला. मोबाईल तपासल्यावर समोर आले की, एका व्हॉट्सॲप ग्रुपवर परीक्षा सुरू होण्यापूर्वीच प्रश्नपत्रिका आणि संभाव्य उत्तरे शेअर केली गेली होती. विद्यार्थिनीच्या निवेदनानुसार आणखी काही विद्यार्थ्यांची चौकशी सुरू झाली आहे. प्राथमिक तपासात एका खाजगी कोचिंग क्लासशी संबंधित व्यक्तीने पैशाच्या मोबदल्यात पेपर लीक केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिस या आर्थिक देवाणघेवाणीचे धागेदोरे तपासत आहेत.

साई मंदिर परिसरात दर अर्ध्या तासाने वेषांतर करून येतात अन् चोरी करून जातात

आंध्रातील त्या टोळीने शिर्डी हादरली

भाईंदर। अहिल्यानगर जिल्ह्यातील शिर्डीतील साईबाबांच्या मंदिरात संपूर्ण देशातून भाविक येत असतात. दररोज येथे हजारो भाविक दर्शन घेतात. मात्र आता शिर्डीतून भयंकर प्रकार समोर आला आहे.

शिर्डीच्या साईबाबा मंदिर परिसरात दर अर्ध्या तासाने कपडे बदलून भाविकांच्या गर्दीत मिसळून चोरीचा डाव आखणाऱ्या आंध्र प्रदेशातील टोळीचा शिर्डी पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. दोन महिला, एक पुरुष आणि एका बालकाला पोलिसांनी ताब्यात घेतले असून आरोपींकडून महागड्या कंपनीचे मोबाइल आणि रोख रक्कम जप्त केली आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



वेशांतर करून चोरी

अटक करण्यात आरोपींच्या झडतीदरम्यान त्यांच्याकडून १० मोबाइल फोन, ११७० रुपये रोख रक्कम, ब्लेड्स आणि कटर तसेच अल्पवयीन बालकाकडूनही एक मोबाइल हस्तगत करण्यात आला आहे. यातील बालकाला तातडीने चिल्ड्रन होममध्ये दाखल करण्यात आले आहे. ही टोळी भाविकांसारखाच वेश परिधान करून गर्दीत मिसळत होती. महिलांनी सुरुवातीला पंजाबी ड्रेस घातला होता, तर नंतर साडी परिधान करून पुन्हा परिसरात वावरल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले. चोरट्यांची ही पद्धत पाहून पोलिसही अचंबित झाले. या वेशांतराच्या माध्यमातून पोलिस आणि मंदिर सुरक्षा रक्षकांची दिशाभूल करण्याचा त्यांचा डाव होता. मात्र पोलिसांच्या चाणाक्ष नजरेमुळे शिर्डीत या परप्रांतीय टोळीचा पदार्फाश झाला आहे.

भाविकांच्या वस्तूंची चोरी

साई मंदिर परिसरात एका भाविकाची पर्स ब्लेडने कापली गेल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर सीसीटीव्हीच्या आधारे तपास करत असताना पोलिसांना चक्रावून टाकणारी माहिती समोर आली. काही महिला आणि पुरुष साई मंदिर परिसरात संशयास्पदरीत्या फिरताना सीसीटीव्हीत दिसून आले. या संशयितांना ताब्यात घेतले असता एक पुरुष आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला. उर्वरित एक पुरुष, दोन महिला आणि एक अल्पवयीन बालक यांना ताब्यात घेण्यात आले.

शिर्डी पोलिसांसमोर चोरीला आळा घालण्याचे आवाहन

दरम्यान, साईबाबांच्या दर्शनासाठी देश विदेशातून हजारो भाविक दररोज शिर्डीत येत असतात. आधीच परप्रांतीय भिक्षेकऱ्यांचा विषय ऐरणीवर आलेला असताना आता शिर्डीत परप्रांतीय चोरट्यांच्या टोळ्या देखील सक्रिय असल्याचे समोर आले आहे. यामुळे या चोऱ्यांना आळा घालण्याचे मोठे आव्हान शिर्डी पोलिसांसमोर आता असणार आहे.

घरफोडीचा गुन्हा उघड... १५ लाखांहून अधिक किंमतीचे ८३ मोबाईल जप्त

वसई। घरफोडीच्या गुन्हयाची उकल करुन १५ लाखापेक्षा जास्त किंमतीचे ८३ मोबाईल फोन हस्तगत करण्यात गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांची कामगिरी. अधिक माहितीनुसार विरार पोलीस ठाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्हयातील फियार्दी श्री ऋषीकेश चेलाराम गुप्ता वय २४ वर्ष राहणार सुरेश ॲटो पेट्रोलपंपाच्या बाजूला, विरार फाटा, कन्हेर, विरार पूर्व, ता वसई, यांच्या शॉप नं ०७, प्रभाकर अपार्टमेंट, सिटी बार अँड रेस्टॉरंट समोर, चंदनसार रोड, विरार पूर्व या मोबाईल शॉप दुकानाचे दिनांक १६/०२/२०२६ रोजी रात्री ०८.०० वाजता ते दिनांक १७/०२/२०२६ रोजी सकाळी ०८.३० वाजताचे सुमारास कोणीतरी अज्ञात चोरट्याने शटरच्या लॉकची कडी कशाने तरी तोडून दुकानात प्रवेश करुन २१,८६,०००/- रुपये किंमतीचे वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल घरफोडी करुन चोरुन नेले होते.

नमुदची घरफोडी ही मोबाईल



दुकानात झाली असल्याने अशा प्रकारचे मोबाईल दुकानात घरफोडी करण्याची गुन्हे पार्श्वभूमी असलेल्या रेकॉर्डवरील आरोपी पप्पु ऊर्फ अजमतअली मोहम्मदअली शेख याचा शोध घेत असताना गुन्हे प्रकटीकरण कक्षाचे सफौज / मनोज मोरे यांचे बातमीदाराकरवी नमुदचा गुन्हा हा नमुद आरोपीनेच केला असल्याचे तपासात निष्पन्न करुन गुन्हयाची उकल करण्यात आली.गुन्हयात निष्पन्न आरोपी पप्पु ऊर्फ अजमतअली मोहम्मदअली शेख, रा. धानिवबाग, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर मुळ रा. भरोठीया, हेथमाली, डुमरियागंज, जि. सिध्दार्थनगर, राज्य उत्तरप्रदेश , नमुद गुन्हयाची उकल केल्यानंतर आरोपीने गुन्हयात चोरलेले मोबाईल हे त्याने ट्रॅव्हल्स मधून कुरीअर व्दारे त्याचे मुळ गावी जि. सिध्दार्थनगर, राज्य उत्तरप्रदेश येथे पाठवित असल्याचे माहीती प्राप्त करुन सदर गुन्हयात चोरीस गेलेल्या मोबाईल पैकी १५,४७,६१६/- रुपये किंमतीचे एकुण ८३ मोबाईल फोन जप्त करुन हस्तगत करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री निकेत कौशिक, पोलीस आयुक्त, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. मदन बल्लाळ सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली, गुन्हे शाखा २ वसई युनीटचे पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सपोनिरी/सोपान पाटील, पोउपनिरी / संतोष घाडगे, सहाफौज / संजय नवले, मुकेश पवार, रविंद्र पवार, मनोज मोरे, चंदन मोरे, पोहवा / प्रफुल्ल पाटील, सचिन पाटील, जगदिश गोवारी, दादा आडके, प्रशांत ठाकुर व राहूल कर्पे यांनी उत्कृष्टपणे पार पाडली आहे.

डिजीटल अटकेची भीती दाखवून निवृत्त बँक अधिकाऱ्याची १.८३ कोटीची फसवणूक

मुंबई। डिजीटल अटकेची भीती दाखवून एका निवृत्त बँक अधिकार्‍यायाची १ कोटी ८३ लाखांची फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पूर्व सायबर सेलने अज्ञात सायबर ठगाविरुद्ध फसवणुकीसह आयटीच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. अटक होऊ नये म्हणून या निवृत्त अधिकार्‍यायाने त्याचे एफडी मोडले, बँकेतील कॅशसहीत दागिने विक्री करून सर्व रक्कम सायबर ठगांना पाठविल्याचे तपासात उघडकीस आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार मुलुंड येथे राहत असून एका नामांकित बँकेतून निवृत्त झाले आहेत. जानेवारी महिन्यात त्यांना एका अज्ञात व्यक्तीने कॉल करून तो टेलिकॉम विभागातून बोलत असल्याचे सांगितले होते. त्यानंतर सायबर ठगाने निवृत्त बँक अधिकाऱ्याला तुमच्याविरुद्ध गुन्हा दाखल अशून वरिष्ठ पोलीस अधिकारी तुमची चौकशी करणार आहेत. त्यामुळे तुम्ही चौकशीला सहकार्य करावं, अशी विनंती केली होती. त्यानंतर काही



वेळानंतर निवृत्त बँक अधिकाऱ्याला एका अज्ञात व्यक्तीने फोन करून गुन्हे शाखेचा पोलीस अधिकारी असल्याचे सांगून चौकशी सुरू केली. व्हिडीओ कॉलद्वारे निवृत्त बँक अधिकाऱ्याला विविध प्रश्ने विचारण्यात आली. तसेच त्यांच्या बँक खात्यासह इतर ठेवी आणि गुंतवणुकीबाबत देखील माहिती घेण्यात आली. निवृत्त बँक अधिकाऱ्याला भीती वाटावी म्हणून गुन्हे शाखेचा पोलीस अधिकारी म्हणून फोन केलेल्या अज्ञात व्यक्तीने त्यांना सांगितले की, तुमच्याविरुद्ध घाटकोपर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून तुम्हाला कोणत्याही क्षणी अटक होईल. तसेच सध्या तुम्ही डिजीटल अटकेत आहात. त्यानंतर आरोपीने त्यांना बँक खात्यासह एमडी मोडून पैसे पाठविण्यास सांगितले. अटकेच्या भीतीने निवृत्त बँक अधिकाऱ्याने जानेवारी ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत टप्याटप्याने १ कोटी ८३ लाख रुपये आरोपीने दिलेल्या बँक खात्यात जमा केले. चौकशी संपताच तुम्हाला तुमची रक्कम परत मिळेल, असे आरोपीने निवृत्त बँक अधिकाऱ्याला सांगितले होते. मात्र रक्कम आरोपीच्या खात्यात पाठवल्यानंतर त्यांची चौकशी झाली नाही. तसेच गुन्हे शाखेचा पोलीस अधिकारी म्हणून फोन केलेल्या व्यक्तीने निवृत्त बँक अधिकाऱ्याच्या खात्यात ट्रान्स्फर केले नाही. फसवणुकीचा हा प्रकार लक्षात येताच निवृत्त बँक अधिकाऱ्याने पूर्व सायबर सेलमध्ये तक्रार दाखल केली. या तक्रारीची शहानिशा केल्यानंतर पोलिसांनी अज्ञात सायबर ठगाविरुद्ध तोतयागिरी करून फसवणूक करणे आणि आयटी कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. सध्या या गुन्ह्यांचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलीस बातमी पत्र

विविध

२

मुंबई, मंगळवार,३ मार्च २०२६ ते ९ मार्च २०२६

मानेचा मसाज जीवघेणा ठरू शकतो

केस कापायला गेलो की, सलूनमधील कारागीर आपले केसच कापतो असे नाही तर अनेक प्रकारे मरम्मत करत असतो. केस कापून झाले किंवा दाढी झाली की ही मरम्मत सुरू होते. आधी डोक्याला तेल लावून डोक्याचा मसाज केला जातो, मग मसाज करणारा हात खाली खाली येत आपल्या मानेजवळ येतो. मानेवर हात दाबून ती छान दाबली जाते आणि मग एका हातात हनुवटी आणि एका हातात डोके पकडून मान मोडली जाते. अशी मान मोडली आणि मानेला मसाज मिळाला की ग्राहकाला आनंद मिळतो आणि तो फ्रेश होतो. बरे वाटते पण या कामात आपल्या मानेच्या काही नसा दुखावल्या जातात आणि श्वास घ्यायला त्रास व्हायला लागतो. काही वेळा तर यातून कायमची दुखापत होण्याची शक्यता असते. या मसाजने ज्या नसा दुखावल्या जातात त्या श्वास घेण्याशी संबंधित असल्याने मोठा त्रास होतो,



कारण माणसासाठी श्वास सर्वात महत्त्वाचा आहे. एका रुग्णावर या मसाजचा असा परिणाम झाला आणि काही वेळाने त्याला श्वास घेणे त्रासदायक व्हायला लागले. तो हॉस्पिटलमध्ये गेला तेव्हा त्याची ही अवस्था बघून डॉक्टरांनाही त्याला नेमके काय झाले असावे, याचा अंदाज येईना म्हणून त्यांनी अनेक प्रकारच्या तपासण्या करून पाहिल्या; पण काही बोध होईना म्हणून त्यांनी त्याची छाती नीट तपासली कारण त्याला श्वासाचा असा त्रास व्हावा असा काही आजार नव्हता. त्याची छाती तपासली, तेव्हा असे लक्षात आले की, नेहमी श्वास घेताना छाती भात्यासारखी खाली वर होतच नाही. त्याला छाती वर ओढावी लागत आहे, कारण छातीचा भाता चालवणाऱ्या नसा कायमच्या दुखावल्या होत्या. शेवटी त्याला त्याने गेल्या दोन दिवसांत काय काय केले, याची माहिती विचारली, तेव्हा त्याने या मसाजची माहिती दिली आणि सारा उलगडा झाला. आता त्याला एक उपकरण बसवल्याने श्वास घेता येत आहे; पण हे यंत्र कायम बसवावे लागणार आहे. या प्रकरणाचा विचार करून सर्वांनी सलूनमध्ये मसाज करताना काळजी घ्यावी.

पारंपरिक साड्यांना 'मॉडर्न लूक'

एखादी सुंदर साडी दिसली का महिलांना ती साडी खरेदी करण्याचा मोह होतो. ती साडी एखाद्या समारंभात नेसली का पुन्हा नेसण्याचा महिला विचारदेखील करत नाहीत. नव्या कार्यक्रमाकरता पुन्हा एखादी नवी साडी विकत घेतली जाते. मात्र अशा बऱ्याच नव्या कोऱ्या साड्या घरात असतात, ज्या नवीन असूनदेखील नेसल्या जात नाहीत. मात्र या साड्यांपासून न्यू लूकचे फॅशनेबल कपडे शिवले जाऊ शकतात. चला तर जाणून घेऊया साडीपासून तयार केलेले फॅशनेबल ड्रेसेस.

लाँग गाऊन्स

सध्या गाऊन्सचा जमाना आहे. बऱ्याच मुली महागाईचे गाऊन विकत घेतात. मात्र आपल्या घरी एखादी सुंदर आणि नवी कोरी साडी असल्यास त्या साडीपासून आपण गाऊन तयार करू शकतो. साडीपासून गाऊन तयार करण्यासाठी मस्त अशा बॉर्डर असलेल्या कॉटन साडीची आवश्कता असते. त्या साडीपासून आपण सुंदर असा लाँग गाऊन शिवू शकतो. हा गाऊन एक वेगळा लूक आपल्याला देईल.

जॅकेट्स

सध्या जॅकेट्सची चलती आहे. शॉर्ट टॉप असो किंवा एखादे टी-शर्ट असो त्यावर जॅकेट्स घातले की एक नवीन लूक दिसतो. हे जॅकेट तुम्ही साडीपासूनही शिवू शकता. वेगवेगळ्या प्लेन किंवा बुट्टे असलेल्या साड्यांपासून सुंदर असे जॅकेट तयार होऊ शकते. हे जॅकेट्स विविध स्टाईलनेदेखील शिवून फॅशन करू शकता.

शॉर्ट टॉप

शॉर्ट ड्रेस शिवण्यासाठी शक्यतो सिल्क साड्यांचा वापर करावा. अशा काही सिल्क साड्या असतात. त्यांचा काठ मोठा असतो आणि त्या नेसल्यावर उठावदार दिसतात. अशा साड्यांपासून जिन्स, लेगिन्सवर घालता येतील असे शॉर्ट टॉपदेखील शिवता येतात. यामुळे एक नवीन फॅशनदेखील होते आणि तो टॉप साडीपासून शिवला असल्याचेदेखील कळत नाही.

बॉर्डर गाऊन्स

ज्या साड्यांना मोठा आणि सोनेरी रंगाचा काठ असतो, अशा साड्यांपासून आपण बॉर्डर गाऊन्स शिवू शकतो. साडीचा काठ काढून नेक आणि फ्रंटसाईटला लावल्याने हा एकआगळा वेगळा बॉर्डर गाऊन शिवता येतो. यामुळे लूकदेखील हटके दिसतो.

वनपिस

सध्या तरुणींचा कल वनपिसकडे वाढला आहे. अनेक तरुणी फॅशनेबल वनपिस मोठ्या प्रमाणात घालतात. मात्र काही तरुणींना आपल्या आवडीनुसार रंग मिळत नाही; परंतु त्या रंगाची साडी असल्यास त्यापासून आपण वनपिस शिवू शकतो. या वनपिसमुळे तुम्ही हटकेदेखील दिसू शकतात.



कफ्तान

साड्यांपासून कफ्तानदेखील शिवू शकतो. कफ्तानचे अनेक प्रकार आहेत. कफ्तानमध्ये टॉप, शॉर्ट ड्रेस आणि वनपिस हेदेखील प्रकार येतात. कफ्तान टॉप लेगिन्स आणि जिन्सवर देखील घालता येतो. या ड्रेसिंगमध्ये एक आगळा वेगळा स्मार्ट लूक दिसतो.

ब्लॅक ब्युटी

काळा हा रंग सगळ्यांना आवडतो. त्यामुळे बऱ्याचदा काळ्या रंगाच्या सोनेरी बुट्टे असलेल्या साड्या खरेदी केल्या जातात. मात्र या साड्या काही महिला शुभ समारंभात घालत नाहीत. त्यामुळे त्या तशाच पडून राहतात; परंतु या काळ्या रंगाच्या साड्यांपासून अफलातून अशी ब्लॅक ब्युटी करू शकतो. काळ्या रंगांच्या साड्यांपासून कुर्ती, टॉप आणि वनपिस शिवता येऊ शकतात. या काळ्या रंगामुळे व्यक्ती डिसेंट दिसते. अशा या हटके आयडिया वापरून तुम्ही भन्नाट स्टायलिश राहू शकता. चला तर मग फॅशनेबल राहायचे असल्यास नक्कीच या आयडियांचा वापर करून पाहा.



प्रत्येक आजारांवर ५ सोपे उपाय!

▶ अजीर्ण किंवा कफाच्या समस्येमुळे तोंडातून वास येत असेल तर रोज दहा ग्रॅम मनुकांचे सेवन केल्याने हा रोग बरा होण्यास मदत मिळतो. बहेडे आणि साखर सम मात्रेत घेऊन त्याचे सेवन केल्याने डोळ्यांचा आजार दूर होतो.

▶ कैरीच्या कोयीचे चूर्ण दही किंवा पाण्यासोबत सकाळ-संध्याकाळ घेतल्याने कृमी रोगात आराम पडतो.

▶ कॉलरा रोगात जेव्हा शरीर अकडून जाते, तेव्हा अक्रोडाच्या तेलाने मालीश केल्याने आराम मिळतो.

▶ पेरूच्या पानांना वाटून सांधेदुखी रोगात सुजलेल्या भागात तो लेप लावल्याने आराम मिळतो.

▶ हिरड्यांतून पाणी येत असेल तर गुलाब पाणी आणि डाळिंबाच्या वाळलेल्या फुलांची पूड तयार करून घ्यावी. याने दात घासल्यास हिरड्यांतून पाणी येणे थांबते.

प्रेग्नन्सीनंतर फिट राहण्यास मदत करतील या '५' गोष्टी, वजन कमी करण्यास येतील कामी

सर्वसाधारणपणे गरोदरपणात अनेक महिलांचे वजन वाढते. ते वाढणे स्वाभाविकच असते. एक नवा जीव तुमच्या पोटात वाढत असतो. शिवाय, महिलांच्या शरीरात हार्मोन्ससह अनेक गोष्टींत बदल होतात. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांचे वजनही वाढते. या कारणामुळे प्रसूतीनंतर हे वाढलेले वजन कमी कसे करावे? असा प्रश्न महिलांना पडतो. शिवाय, वजन कमी करण्याच्या नादात जेवण कमी केले, तर तुमचे स्तनपान केलेल्या बाळावरदेखील त्याचा परिणाम होतो. अशा वेळी काय करावे, हे महिलांना सूचत नाही.



त्यामुळे अनेक महिलांना देवाने दिलेली मातृत्वासाठी सुंदर गोष्ट देखील नाकारतात. म्हणून आज आम्ही तुम्हाला आज असे ५ महत्त्वाचे पदार्थ सांगणार आहोत, ज्याने तुमचे प्रसूतीनंतर वजन आटोक्यात येऊ शकते. आणि जे पदार्थ खाल्ल्याने तुमच्यावर वा तुमच्या बाळावर कुठलाही विपरीत परिणाम होणार नाही.

जीरं

जीऱ्याचे उकळलेले पाणी प्या किंवा दुधात जीरे पावडर मिसळून प्या. जीऱ्याचे पाणी प्यायल्याने ॲसिडिटीची समस्याही दूर होईल.

ओवा

पाण्यात ओवा टाकून उकळून घ्या आणि सकाळी रिकाम्या पोटी हे पाणी प्या. शिवाय, चपातीच्या पिठातही ओवा टाकून तुम्ही खाऊ शकता.

मेथी दाणा

एक चमचा मेथीचे दाणे ग्लासभर पाण्यात भिजवून ठेवा आणि हे पाणी सकाळी प्या. मेथी दाणे टाकून उकळलेले पाणी तुम्ही ब्रेकफास्ट किंवा लंचनंतरही पिऊ शकता. प्रेग्नन्सीनंतर उद्भवणारी सांधेदुखीची समस्याही मेथीच्या सेवनाने दूर होते.

हळद

शरीरातील टॉक्सिन्स बाहेर काढण्याव्यतिरिक्त वजन घटवण्यातही हळद फायदेशीर आहे. दूध किंवा पाण्यात मिसळून तुम्ही हळदीचे सेवन करू शकता.

बडीशेप

बडीशेप टाकून उकळलेले पाणी प्या. जर तुम्हाला गॅसची समस्या असेल तर कच्ची बडीशेप चावून खाऊ शकता.


एनिमियापासून बचाव करतो जलजीरा

गर्मीची धमक सुरू झाल्याबरोबर लोक जलजीरा पिणे पसंत करू लागतात. जलजीरा पिण्याचे बरेच फायदे आहे.

असे आहे जलजीरा पिण्याचे फायदे

- जलजीरा पिण्यामुळे एनिमियाची समस्या दूर होते. जीऱ्यात लोह पदार्थ बऱ्याच प्रमाणात असतात.
- जलजीऱ्याचे पाणी रोज प्यायल्यास रक्ताची कमतरता होत नाही.
- जलजीरा पिण्यामुळे वजन कमी होते. जलजीऱ्यात कॅलोरी नसते आणि ते शरीरातील टॉक्सिक पदार्थाला बाहेर काढते. यामुळे वजन कमी होण्यास मदत मिळते.
- जलजीरा गॅसच्या समस्येपासूनही सुटकारा मिळवतो. जलजीराच्या पाण्याचे सेवन केल्याने कब्जची समस्याही दूर होते.
- उन्हाळ्यात डिहाईड्रेशनची देखील समस्या असते. जलजीरा यातदेखील फायदेशीर ठरतो.





तूरडाळ पकोडा

साहित्य : १ वाटी तूरडाळ, १ कांदा बारीक चिरून, ४ ते ५ लाल मिरच्या, ४ ते ५ कडीपत्ता पाने बारीक चिरून, १ इंच आलेचा तुकडा किसून, चिटभर हिंग, चवीपुरते मीठ, तेल तळण्यासाठी.

कृती : प्रथम तूरडाळ निवडून धुऊन घ्यावी. नंतर किमान दोन तास पाण्यात भिजत ठेवावी. मिक्सर जारमध्ये लाल मिरची घालून त्याची पेस्ट बनवून घ्यावी. नंतर जारमध्ये निथळलेली तूरडाळ घालावी. त्यातच लाल सुमा मिरचीची पेस्ट घालून मिश्रण भज्याच्या पिठाप्रमाणे बनवून घ्यावे. आता तयार पीठ बाऊलमध्ये काढून त्यात बारीक चिरलेला कांदा, कढीपत्ता, आले, हिंग आणि मीठ घालून मिश्रण चांगले एकजीव करून पंधरा मिनिटे झाकून ठेवावे. आता गॅसच्या मध्यम आचेवर कढईत तेल गरम करावे. भज्याचे पीठ परत एकदा हातानेच मिक्स करावे. आच मंद करून भज्याचे पीठ गरम तेलात सोडावे. भजी हलक्या सोनेरी रंगावर आणि कुरकुरीत झाली की, पेपर नॅपकीनवर काढावीत. म्हणजे जादाचे तेल शोषले जाईल. आता तयार गरम तूरडाळ

नेलपेंटचा रंग दर्शवतो तुमची पर्सनॅलिटी

नखं छान दिसावीत म्हणून आपण नखांना अगदी हमखास नेलपेंट लावतो. हल्ली तर इतक्या निरनिराळ्या प्रकारच्या आणि रंगाच्या नेलपेंट्स बाजारात मिळतात की, कोणता रंग आपण लावावा, असा प्रश्न हमखास अनेकांना पडतो. पण तरीही कितीही पेचात असलो तरी शेवटी आपण आपल्या आवडीचा रंग निवडत असतो. तुमच्या नेलपेंटचा रंग तुमची पर्सनॅलिटी दर्शवत असतो. जाणून घेऊया



गोल्डन/सिल्व्हर रंग : काहींना ग्लिटरी रंग लावायला आवडतात. असे रंग लावणाऱ्या व्यक्ती कायमच आकर्षित करणाऱ्या असतात. त्यांना कायम लोकांनी आपल्याकडे पाहत राहावे असे वाटते. त्यांचे व्यक्तिमत्त्व तसे असल्यामुळे तसे होतेसुद्धा म्हणा. गोल्डन, सिल्व्हरचे शेड लावणारे लोक म्हणूनच थोडे खास असतात.

लाल रंग : काहींना लाल रंगाच्या शेड्स इतक्या आवडतात की, तुम्हाला कायम त्यांच्या बोटांना लाल रंगाचीच नेलपेंट दिसून येते. लाल रंगामुळे तुमची बोटं अगदी चार चौघात उठून दिसतात. असे व्यक्ती फार सेक्सी, धाडसी असतात. कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाण्याची त्यांची तयारी असते.

काळा रंग : हल्ली खूप जण काळ्या रंगाची नेलपेंट लावताना दिसतात. काळा रंग हा ट्रेंडमध्ये असला तरी त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व प्रतिबिंबित होते. काळ्या रंगाची नेलपेंट लावणारे लोक कलात्मक असतात. म्हणजे त्यांना कला क्षेत्राची आवड अधिक असते. फॅशन, संगीत अशा क्षेत्रात काम करणारे व्यक्ती असतात. काळा रंग जरी त्यांची पर्सनॅलिटी खुलवत असेल तरी अशी लोक मनाने फारच हळवी असतात.

गुलाबी रंग : आता महिलांना सर्वसाधारणपणे नेलपेंटसाठी आवडणारा रंग म्हणजे गुलाबी. आता या गुलाबी रंगातही बरेच शेड्स आहेत. म्हणजे तुम्ही हॉट पिंक हा शेड लावत असाल,तर तुम्ही बोल्ड विचारांचे असता. त्यांच्यातील सद्सद्विवेकबुद्धी चांगली असते. तर फिकट गुलाबी रंग लावणारे हळव्या मनाचे असतात. त्यांना इतरांची काळजी घ्यायला खूप आवडते. अशा व्यक्तींना इतरांची काळजी फार असते.

निळा रंग : हल्ली निळ्या रंगाच्या नेलपेंट्स लावायला अनेकांना आवडते. निळा रंग शांतता आणि सामंजस्याचे प्रतीक असते. अशा व्यक्ती शांत आणि समजूतदार असतात. त्यांना त्याच्या नियमानुसार वागायलाच आवडते. त्यामुळे कोणताही अन्य मार्ग स्वीकारायला तयार नसतात.

निऑन रंग : थोडेसे भडक असे निऑन रंग असतात. त्यामध्ये वेगवेगळ्या रंगाची शेड असते. नवीन आयडियाज आणि नवीन आव्हानांसाठी ही लोक तयार असतात. या लोकांमध्ये कमालीची ऊर्जा असते. यांना नेहमी नव्या कल्पना सुचतात.

न्यूड रंग : नखांचा रंगाला जाईल असे रंग म्हणजे न्यूड रंग खूप जणांना आवडतात. अशा व्यक्ती फार स्थिर असतात.

मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या सततच्या वापराने शरीरावर होऊ शकतात दुष्परिणाम ?

आपण संपूर्ण दिवसभरात अनेक प्रकारची गॅजेट्स वापरत असतो. या गॅजेट्समार्फत जगभरातील घडामोडी अगदी घरबसल्या आपल्याला समजत असतात. पण या गॅजेट्सच्या सतत वापराचा परिणाम आपल्या आरोग्यावर अनेक प्रकारे होऊ शकतो. गॅजेट्सच्या आहारी गेल्याने निद्रानाशासारखे त्रास जाणवू लागल्याचे आपण अनेकदा ऐकत असतो, पण या गॅजेट्समुळे आपल्या शरीरावरही अनेक प्रकारचे दुष्परिणाम होत

काही व्यक्तींना मोबाइल किंवा कॉम्प्युटरच्या स्क्रीनकडे पाहताना सतत डोळे बारीक करून पाहण्याची सवय असते. त्यामुळे डोळ्यांच्या अवतीभोवती सुरकुत्या पडू लागतात, तसेच डोळ्यांवरही सतत ताण जाणवू लागतो. त्यामुळे स्क्रीनकडे बघताना डोळे बारीक करून बघणे टाळावे. कॉम्प्युटर किंवा मोबाइल आपल्या शरीराच्या खूप जवळ ठेवणे हे टाळावे. या गॅजेट्समधून बाहेर पडणारे रेडिओमॅग्नेटिक किरण आपल्या शरीरासाठी हानिकारक असतात. तसेच कॉम्प्युटर किंवा मोबाइल स्क्रीनमधील अल्ट्रा व्हायोलेट किरणांमुळे त्वचा आणि डोळे या दोहोंना अपाय होऊ शकतो.कॉम्प्युटर वर काम करताना आपण वापरतो ती खुर्ची आरामदायक असेल असे पहावे. काही व्यक्तींना दिवसभर कॉम्प्युटरवर काम करावे लागते, त्यांनी या गोष्टीची विशेष काळजी घ्यावी. खुर्ची बसण्यास आरामदायक नसेल, तर त्याचा ताण पाठीच्या मणक्यांवर जाणवायला लागून, पाठदुखीचा त्रास सुरू होऊ शकतो. तसेच सतत बसून काम केल्याने पायांकडे होणारे रक्ताभिसरण व्यवस्थित न होऊन, पायांवर सूज येऊ लागते. असे होऊ नये म्हणून थोड्या थोड्या वेळाने जरासे पाय मोकळे करण्यासाठी ऑफिस मध्येच किंवा घरातल्या घरात पायी चालावे किंवा लिफ्टऐवजी जिन्यांचा वापर करावा. अनेक व्यक्तींना मोबाइल फोन खांद्याच्या व कानाच्या मध्ये धरून, एकीकडे काम करत बोलण्याची सवय असते. अशा पद्धतीने जास्त वेळ बोलत राहिल्यास मानेचे दुखणे उद्भवू शकते. तसेच कॉम्प्युटरवर खाली मान झुकवून काम करत असल्यासही मानदुखीचा त्रास उद्भवू शकतो. त्यामुळे कॉम्प्युटरचा स्क्रीन नेहमी आपल्या डोळ्यांसमोर असेल अशा पद्धतीने ठेवायला हवा. रात्री झोपायच्या अर्धा तास आधीपासून कॉम्प्युटर किंवा मोबाइलचा वापर करणे थांबवावे. त्याऐवजी मन शांत करणारे आपल्या आवडीचे एखादे चांगले पुस्तक वाचावे, किंवा शांत संगीत ऐकावे. त्यामुळे शांत झोप लागण्यास मदत मिळते.

खास फीचरसह लॉक करा तुमचं सिमकार्ड, फोन हरवल्यावर किंवा चोरी झाल्यावर देखील राहील सुरक्षित

जर तुम्हाला तुमचा फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर सिमकार्ड किंवा नंबरचा गैरवापर टाळायचा असेल, तर सिमकार्ड लॉक करता येईल. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्हीमध्ये मिळत आहे.

स्मार्टफोन्समध्ये कितीही फीचर्स असले तरी त्यात खरा जीव सिमकार्ड टाकल्यावर येतो. कॉलिंग असो किंवा एसएमएस आणि मोबाइल डेटाचा वापर करण्यासाठी सिमकार्डची आवश्यकता असते. विशेष म्हणजे तुम्ही हवं असल्यास तुमचं सिमकार्ड लॉक करू शकता, त्यामुळे फोन चोरी झाल्यावर किंवा हरवल्यावर त्याचा गैरवापर करता येत नाही. स्मार्टफोनवर लॉक सेटअप करतो तसं सिमकार्ड पण लॉक करता येतं. जर तुम्ही हे फीचर इनेबल केलं, तर सिमकार्डचा गैरवापर करता येणार नाही. कोणीही दुसरा युजर तुम्ही सेट केलेला पिन एंटर केल्याविना सिम वापरू शकणार नाही. हे फीचर अँड्रॉइड आणि आइओएस दोन्ही डिवाइसेजमध्ये सहज इनेबल करता येतं.

अँड्रॉइड फोनमध्ये असं लॉक करा सिम

- सर्वप्रथम सेटिंग्स ओपन करा आणि मग सिक्युरिटी सेटिंग्स मध्ये जा.
- तिथे सर्वात खाली स्क्रोल केल्यावर मोअर सेटिंग्स वर टॅप करा.
- त्यानंतर सिमकार्ड लॉकची निस्वाद करा आणि पिन सेटअप करा.
- पहिल्यांदा तुम्हाला डिफॉल्ट पिन एंटर करावा लागेल आणि त्यानंतर नवीन पिननं सिमकार्ड लॉक करण्याचा पर्याय मिळेल.
- वेगवेगळ्या टेलिकॉम ऑपरेटर्सचा डिफॉल्ट पिन वेगवेगळा असतो. नवीन पिननं सिमकार्ड लॉक केल्यावर पिन एंटर केल्याविना सिम कार्डचा वापर करता येणार नाही.

आइओएस डिव्हाइसमध्ये असं लॉक करा सिम

- तुमच्या आयफोनच्या सेटिंग्स मध्ये जा आणि तिथे मोबाइल डाटा वर टॅप केल्यावर सिम पिनचा पर्याय निवडा.
- त्यानंतर डिफॉल्ट पिन एंटर करूनच तुम्हाला पुढे जात येईल.
- पुढे तुम्हाला चेंज पिन ऑप्शनवर टॅप केल्यावर तुमचा नवीन पिन एंटर करावा लागेल, म्हणजे सिम कार्ड लॉक होईल.
- हा पिन एंटर केल्याविना

संपादकीय

आर्थिक विश्वासार्हतेचा पाया



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दजार्चे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.

मुंबई महानगरपालिकेसह राज्यातील एकूण २९ महानगरपालिकांच्या निवडणुका नुकत्याच पार पडल्या; परंतु सर्वाधिक चर्चा होती, ती मुंबई महापालिकेची. गोवा, त्रिपुरा, अरुणाचल प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यांपेक्षाही मोठा अर्थसंकल्प असलेल्या मुंबई महापालिकेच्या आर्थिक नाड्या कोणाच्या हाती असतील, याकडे महाराष्ट्राचे नव्हे, तर देशपातळीवरील अनेक राजकीय पक्षांचे लक्ष होते. रितू तावडे यांच्या रूपाने भाजपचा महापौर विराजमान झाला. केंद्रात, राज्यात आणि मुंबई महापालिकेत भाजपची सत्ता आल्याने ट्रिपल इंजिनच्या माध्यमातून देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईला जागतिक दजार्चे शहर बनवण्याचे काम आता जलदगतीने सुरू होईल.

मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. भूषण गगराणी यांनी दोन दिवसांपूर्वी सन २०२६-२७ या पुढील आर्थिक वषार्साठीचा ८० हजार ९५२ कोटींचा शिलकी अर्थसंकल्प सादर केला. या अर्थसंकल्पात कोणतीही नवीन करवाढ आकारण्यात आलेली नाही. ही मुंबईकरांच्या दृष्टीने दिलासादायक बाब आहे. जागतिक शहराच्या यादीत वरच्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पात कोस्टल रोड, जलशुद्धीकरण प्रकल्प आणि डिजिटल शिक्षणावर विशेष भर देण्यात आल्याचे दिसून आले. दिल्लीसारख्या शहरात प्रदूषणामुळे निर्माण झालेली स्थिती, मुंबईत होऊ नये यासाठी वाढत्या प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी १५९ कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यातून रस्ते धुणे आणि मिस्टिंग मशीनचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येणार आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित अनेक महत्त्वाची कामेही महापालिकेमार्फत केली जातात. यामध्ये प्रामुख्याने सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधांचा समावेश असतो. त्यामुळे या अर्थसंकल्पात काय वाढून ठेवले आहे याकडे जनता डोळसपणे पाहते. शहराचा विकास केवळ टोलेजंग इमारतींवरून नाही, तर तिथल्या नागरिकांच्या जीवनमानावरून आणि आरोग्यावरून मोजला जातो. ह्यआरोग्य हीच खरी संपत्तीह्ण हे सूत्र कोणत्याही शहराच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असते. मुंबईसारख्या गजबजलेल्या शहरात, तर सार्वजनिक आरोग्याचे महत्त्व अधोरेखित करताना आरोग्य विभागासाठी मुंबई महापालिकेने ७ हजार ४०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. त्यात ह्यहिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाह्ण अंतर्गत एआय आधारित मधुमेह आणि डोळ्यांच्या तपासणीची सुविधा मुंबईकरांना मिळणार आहे. तसेच सायन रुग्णालय, अगरवाल रुग्णालय आणि भांडुपमधील नवीन मल्टी-स्पेशालिटी रुग्णालयाचे काम वेगाने पूर्ण केले जाणार आहे.

शिक्षण विभाग हे महापालिकेतील महत्त्वाचे खाते मानले जाते. मुंबई महानगरपालिकेने या आर्थिक वषार्साठी शिक्षणावर विशेष भर दिली आहे. महापालिकेने ४ हजार २४८ कोटी रुपयांचा स्वतंत्र शिक्षण अर्थसंकल्प सादर केला आहे. हा अर्थसंकल्प गेल्या वर्षीच्या (३ हजार ६७४ कोटी रुपये) तुलनेत सुमारे ७.४ टक्क्यांनी अधिक आहे. पालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेश, दप्तर आणि इतर शैक्षणिक साहित्यांचे मोफत वाटप केले जाणार असून, डिजिटल शिक्षणावर भर दिला आहे. त्यासाठी सुमारे ७ हजार ९५३ वर्गखोल्यांचे हाय-टेक डिजिटायझेशन केले जाणार आहे. इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना २० हजार टॅब्लेटचे वाटप केले जाणार आहे. वाढत्या लोकसंख्येची गरज ओळखून पाणीपुरवठा आणि मलनिस्सारण सुधारण्यावर विशेष भर दिला आहे. मुंबई शहरातील अंदाजे लोकसंख्या पावणेदोन कोटींपेक्षा अधिक आहे. शहराची भविष्यातील पाण्याची गरज भागवण्यासाठी १६ हजार कोटी रुपयांची व्यापक भांडवली तरतूद करण्यात आली आहे. येत्या ४ ते ५ वर्षांत मुंबईच्या पाणीपुरवठ्यात प्रतिदिन ८०० दशलक्ष लिटरची वाढ करण्याचे प्रशासनाचे लक्ष्य आहे. समुद्राच्या खा ्या पाण्यापासून गोडे पाणी तयार करण्यासाठी मनोरी येथे २०० एमएलडी क्षमतेचा प्रकल्प उभारला जाणार आहे. यासाठी यंदा ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात आला असून, अर्थसंकल्पातील एकूण तरतुदींपैकी सुमारे ६० टक्के वाटा (४८ हजार १६४.२८ कोटी रुपये) भांडवली खचार्साठी राखीव ठेवण्यात आला आहे. मुंबईतील रस्त्यांच्या काँक्रिटीकरणासाठी ५ हजार ५२० कोटी रुपयांची तरतूद आहे. गेली तीन वर्षे मुंबई महापालिकेत प्रशासक म्हणून कारभार सुरू असताना मुदत ठेवी ९२ हजार कोटी रुपयांवरून ८१ हजार कोटींवर घसरल्या आहेत, असा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला गेला. त्यात तथ्य नाही हे अर्थसंकल्पातून दाखवून देण्यात आले. गेल्या तीन-चार वर्षात रस्ते कामांवर मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आला आहे. सुशोभीकरणावरही कोट्यवधींचा खर्च करण्यात आला आहे. त्यामुळे मुंबईतील खड्ड्यांचे प्रमाण कमी झाले याचा अनुभव मुंबईकरांना येत आहे. मात्र, मुंबई शहरात बेस्ट, मेट्रो, एमएमआरडीए या स्वायत्त संस्थाच्या माध्यमातून रस्त्यावर एकाचवेळी कामे सुरू असल्याने, वाहतुकीच्या कोंडीचा त्रास सहन करावा लागत आहे. मागील वर्षी या सर्व पायाभूत सुविधा प्रकल्पांचा खर्च २ लाख ३३ हजार कोटी रुपये एवढा होता. त्यामुळे एका वर्षात ११ हजार कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. महापालिकेचा महसुली वाढीसाठी सन २०१७ पासून बंद झालेल्या करमणूक शुल्काची आकारणी करण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. तसेच विकासकामाकरिता निधी उपलब्ध करण्यासाठी महापालिका ग्रीन बाँड्स काढण्याची कार्यवाही करणार आहे. मुंबई शहरात रेल्वे स्थानके, रुग्णालये, शाळा आणि अरुंद पदपथांजवळच्या परिसरात फेरीवाल्यांचे बस्तान बसलेले जागोजागी दिसते. महापालिकेने फेरीवाल्यांचा त्रास कमी करण्यासाठी आणि अधिकृत विक्रेत्यांची ओळख पटवण्यासाठी अर्थसंकल्पात क्यूआर कोड आधारित प्रमाणपत्र देण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली, त्याचे स्वागत करायला हवे. मुंबईत सुमारे १ लाख फेरीवाले असले तरी सर्वेक्षणात केवळ १५ हजार फेरीवाले पात्र आढळले आहेत. आता या पात्र फेरीवाल्यांनाच आता क्यूआर कोड असलेले डिजिटल प्रमाणपत्र दिले जाणार असल्याने अधिकृत आणि बेकायदेशीर फेरीवाले ओळखणे सोपे होणार आहे. प्रशासनाकडून यापुढे अनधिकृत फेरीवाल्यांवर कडक कारवाई झाल्यास मुंबईकरांना रस्त्यांवरून चालताना मोकळा श्वास घेता येईल.

70 कोटींचा विश्व मराठी जलसा!



नाशिकच्या भूमीत पार पडलेले विश्व मराठी संमेलन हे नावात ह्यविश्वह्ण आणि अवतारात ह्यभव्यह्ण असले, तरी त्याच्या आशयाची उकल करायला गेलो की प्रश्नांचे ढग अधिक दाटून येतात. आधीच शंभर वर्षांची परंपरा लाभलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनावर कोट्यवधींचा खर्च होत असताना, त्याच धर्तीवर नव्याने ह्यविश्वह्ण संमेलन उभे करण्यामागील नेमका हेतू काय, हा मूलभूत प्रश्न टाळता येत नाही. भाषेचे संवर्धन, जागतिकीकरण, बोलीभाषांचा सन्मान, ज्ञानभाषेचा दर्जा, सातासमुद्रापल्याड मराठीचा झेंडा या सर्व घोषणा आकर्षक आहेत; पण घोषणा आणि धोरण यात फरक असतो. घोषणा मंचावर झळकतात, धोरण मात्र कागदावर, अर्थसंकल्पात आणि कृतीत उतरावे लागते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी व्यासपीठावरून उच्चारलेले शब्द अनेकांना अस्वस्थ करून गेले. शासनाचे मूलभूत काम साहित्य संमेलने भरवणे नाही, हा त्यांचा रोखठोक मुद्दा होता. शासनाने लोकांच्या दैनंदिन प्रश्नांकडे लक्ष द्यावे की उत्सवांच्या आयोजनात रमावे, हा निवडीचा प्रश्न आहे. राज्यात शेतकर्यांच्या आत्महत्या, बेरोजगारी, शिक्षणातील तफावत, आरोग्यसेवेतील कमतरता, पायाभूत सुविधांचे प्रश्न असे असंख्य मुद्दे डोके वर काढत असताना, तब्बल सत्तर कोटी रुपयांचा खर्च करून चार दिवसांचा झगमगाट उभारणे ही प्राथमिकतेची दिशाभूल नाही का? एखादी साधी साहित्यसंस्था सात-आठ कोटी रुपयांत तेच संमेलन यशस्वीपणे पार पाडू शकते, असे सांगितले जाते; मग उरलेले कोट्यवधी नेमके कुठे आणि कशावर खर्च झाले, याचा पारदर्शक हिशोब सार्वजनिकपणे मांडला गेला का? संमेलनाच्या उद्घाटनावेळी मधु मंगेश कर्णिक, उत्तम कांबळे आणि डॉ. सदानंद मोरे यांसारख्या मान्यवरांच्या उपस्थितीने सोहळ्याला मानाचे अधिष्ठान लाभले. डोळे दिपवणारा प्रकाशोत्सव झाला; रोषणाई, मंचसज्जा, ध्वनिसंयोजना, निवास-भोजनाची व्यवस्था, परदेशी प्रतिनिधींचे स्वागत सर्व काही भव्य. पण भव्यतेचा अर्थ भरीवपणा असतोच असे नाही. भव्य मंडपात उच्चारलेले विचार पुढील दहा वर्षांसाठी मराठीच्या वाटचालीचा आराखडा बनले का? ज्ञाननिर्मिती, संशोधन, अनुवाद, तांत्रिक शब्दसंपदा, डिजिटल ग्रंथालये, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म, ग्रामीण वाचनालयांचे सबलीकरण या बाबींवर ठोस निर्णय झाले का? की कार्यक्रमांची रेलचेल, सत्कार-सन्मान आणि छायाचित्रांच्या झगमगाटात मूळ प्रश्न हरवून गेले? मराठीला ह्यज्ञानभाषाह्ण बनवण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली. ही अपेक्षा नक्कीच स्वागतार्ह आहे. पण ज्ञानभाषा बनणे ही एक दीर्घकालीन शैक्षणिक आणि बौद्धिक प्रक्रिया आहे. विद्यापीठांमध्ये मराठीतून संशोधनाला चालना देणे, विज्ञान-तंत्रज्ञान-वैद्यकीय-व्यवस्थापन या क्षेत्रातील अद्ययावत ग्रंथांचे मराठी अनुवाद, नवे शब्दनिर्माण, डिजिटल साधनांची निर्मिती, मराठीतील आंतरराष्ट्रीय जर्नल्स, परदेशी विद्यापीठांत मराठी अभ्यासक्रम या सर्व गोष्टींसाठी मोठ्या प्रमाणावर सातत्यपूर्ण निधी आणि धोरणात्मक पाठबळ आवश्यक असते. सत्तर कोटींच्या खचार्तून या दिशेने किती पावले उचलली गेली, याचे स्पष्ट उत्तर मिळालेले दिसत नाही. संमेलनाच्या आयोजनात स्थानिक संस्थांचे सहकार्य घेतले गेले. विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर दिसली. परदेशातून शेकडो प्रतिनिधी आल्याचे सांगण्यात आले. पण उपस्थितीची संख्या आणि परिणामकारकता यात फरक असतो. विद्यार्थ्यांना बसवून कार्यक्रम ऐकवणे म्हणजे साहित्यसंस्कार होत नाहीत; त्यासाठी शाळा-कॉलेजांमध्ये नियमित वाचनचळवळी, लेखनकार्यशाळा, लेखक-विद्यार्थी संवाद, ग्रंथालय संस्कृतीची जोपासना आवश्यक असते. परदेशस्थ मराठी बांधवांची उपस्थिती नक्कीच महत्त्वाची; पण त्यांच्या माध्यमातून मराठीचे जागतिक नेटवर्क उभे राहिले का? अनुवाद प्रकल्प, सांस्कृतिक देवाणघेवाण, आंतरराष्ट्रीय परिषदांचे नियोजन, डिजिटल प्लॅटफॉर्मची उभारणी या संदर्भात काही ठोस उपक्रम जाहीर झाले का? मराठी भाषा विभागाचे मंत्री उदय सामंत यांच्याकडे उद्योग खात्याची जबाबदारीही आहे. त्यामुळे या संमेलनाचा अवतार काहीसा उद्योगप्रदर्शनासारखा भासल्याची चर्चा झाली. साहित्य संमेलन ही परंपरा नाकारण्याचा हेतू नाही; ती मराठीच्या सांस्कृतिक जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. पण परंपरेचे पुनर्मूल्यांकन करणे आवश्यक असते. आजच्या डिजिटल युगात साहित्याचा प्रसार करण्यासाठी नवे मार्ग उपलब्ध आहेत. ऑनलाईन व्याख्याने, वेबिनार, ई-पुस्तके, ऑडिओबुक्स, पॉडकास्ट, डिजिटल संग्रहालये या माध्यमांतून मराठीला जागतिक व्यासपीठ मिळू शकते. त्यासाठी दीर्घकालीन गुंतवणूक आणि धोरणात्मक नियोजन आवश्यक आहे. चार दिवसांचा उत्सव संपला की त्याची आठवण वृत्तपत्रांच्या कात्रणांत आणि सोशल मीडियाच्या पोस्टमध्ये उरते; पण भाषा जिवंत राहते ती सातत्यपूर्ण कृतीतून. नाशिकच्या संमेलनाने काही क्षणांचा अभिमान दिला असेल; पण अभिमान हा कृतीने सिद्ध करावा लागतो. जर शासन खरोखरच मराठीला ह्यज्ञानभाषाह्ण बनवू इच्छित असेल, तर प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणात मराठी माध्यमाला बळ द्यावे लागेल. तांत्रिक शिक्षणासाठी मराठीतील दजेर्दार पाठ्यपुस्तके उपलब्ध करावी लागतील. संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी अनुदान योजना राबवाव्या लागतील. ग्रामीण भागातील ग्रंथालयांना आधुनिक सुविधा द्याव्या लागतील. छोट्या साहित्यसंस्थांना नियमित आर्थिक पाठबळ द्यावे लागेल. या सर्व गोष्टींसाठी लागणारा निधी जर एका भव्य संमेलनावर खर्च होत असेल, तर त्याचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे. नाशिकमध्ये पार पडलेल्या विश्व मराठी संमेलनाने मराठीच्या नावाने मोठा गजर केला; पण त्या गजरानंतरची शांतता अधिक बोलकी आहे. जर या संमेलनातून ठोस कृतीआराखडा, पारदर्शक हिशोब आणि तळागाळातील संस्थांना बळ देण्याचा निर्णय पुढे आला, तर त्याचा खरा अर्थ साकार होईल. अन्यथा, कोट्यवधींच्या खचार्ची नोंद इतिहासात राहील आणि मराठीच्या संवर्धनाचा प्रश्न मात्र तसाच अनुत्तरित राहील. भाषा ही मंचावरील प्रकाशझोतात नव्हे, तर जनतेच्या दैनंदिन व्यवहारात, शिक्षणात, संशोधनात आणि सर्जनशीलतेत जिवंत राहते. त्या जिवंतपणाला बळ देणे हेच खरे विश्वकार्य ठरेल; अन्यथा ह्यविश्वह्ण हा शब्द केवळ फलकांवर झळकून जाईल आणि मायमराठीच्या खंया प्रश्नांवर अंधारच राहील.

वचने पूर्ण करण्याची क्षमता खरंच आहे का?



मुंबई मनपाची आर्थिक स्थिती पाहता, दिलेली वचने पूर्ण करण्याची क्षमता भाजपमध्ये खरंच आहे का? की विसरशील खास मला दृष्टीआड होता... असं म्हणण्याची वेळ मुंबईकरांवर येणार? भाजपचा महापौर मुंबईत १९८२ नंतर विराजमान झाला. या यशाच्या उत्साहात एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो निवडणुकीत दिलेली वचने, ''महिलांसाठी बेस्ट बस सवलत, पाणी दरवाढीस स्थगिती, झोपडपट्टीमुक्त मुंबई, क्लायमेट कृती आराखडा प्लॅन आदी'' कशी पूर्ण होणार? मुंबई मनपाची आर्थिक स्थिती पाहता, आधीच ठेवी कमी होत असताना आणि मेगा प्रोजेक्ट्सच्या दबावात, ही वचने पूर्ण करण्याची क्षमता भाजपमध्ये खरंच आहे का? की विसरशील खास मला दृष्टीआड होता...वचने ही गोड गोड देशी जरी आता (निवडणूक वचननाम्यात) असं म्हणण्याची वेळ मुंबईकरांवर येणार?

मुंबई ही देशातील आर्थिक राजधानी आहे आणि मुंबई मनपा ही सर्वात श्रीमंत महापालिका. २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात रु.७४ हजार ४२७ कोटींची तरतूद आहे, ज्यात भांडवली खर्च रु.४३ हजार १६२ कोटी (५८%) आणि महसुली खर्च रु.३१ हजार २०४ कोटी (४२%) आहे. हे आकडे आकर्षक असले, तरी राखीव निधी रु.८१ हजार ७७४ कोटींवरून गेल्या पाच वर्षात रु.१० ते रु.१२ हजार कोटींनी कमी झाला. वचनबद्ध दायित्वे रु.२.३२ लाख कोटी आहेत, ज्यात रस्ते, पूल, सांडपाणी प्रकल्पांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत भाजपच्या वचननाम्याची अंमलबजावणी कशी होईल? त्यांच्या पूर्ततेसाठी आवश्यक आर्थिक तरतुदी आणि वास्तविक आव्हाने पाहता, शंका उपस्थित होणे स्वाभाविक आहे.

भाजपने (महायुतीच्या माध्यमातून) जानेवारी २०२६ मध्ये जाहीर केलेला वचननामा मुख्यतः महिलांच्या विकास, पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान आणि सामाजिक कल्याणावर केंद्रित आहे. पण प्रत्येक वचनाची पूर्ती करण्यासाठी किती खर्च लागेल आणि मुंबई मनपाच्या सध्याच्या आर्थिक स्थितीत ते शक्य आहे का?

वचने ही गोड गोड

महिलांसाठी बेस्ट बस सवलत आणि परिवहन सुधारणा करण्याचे वचन भाजपने दिले होते. वचननाम्यात बेस्ट बसमध्ये महिलांसाठी ५०% सवलत (एसटीप्रमाणे) आणि बेस्ट बस दुप्पट करणे (पाच हजार ते १० हजार बस, पूर्ण इलेक्ट्रिक २०२९ पर्यंत) याचा समावेश आहे. बेस्टचा वार्षिक तोटा सध्या रु.२ हजार २०० कोटी आहे आणि मुंबई मनपाकडून अनुदान रु.१ हजार कोटी. ५०% सवलतीमुळे अतिरिक्त अनुदान रु.५००-१,००० कोटी प्रति वर्ष लागेल. पाच वर्षात रु. पाच-दहा हजार कोटी. बस विस्तारासाठी आणखी रु.१० हजार कोटी म्हणजे एकूण रु.१५ ते २० हजार कोटी! मुंबईची वाहतूककोंडी आणि प्रदूषणाच्या समस्या पाहता, हे वचन पूर्ण न झाल्यास जनतेचा विश्वास उडेल.

पाणी दरवाढीस स्थगिती आणि पाणीपुरवठा सुधारणा करण्याचे वचन भाजपने निवडणुकीत दिले आहे. पाणी दरात दरवर्षी ८% वाढ होते, पण वचनानुसार पाच वर्षांसाठी पाणी दरवाढीस स्थगिती याशिवाय टँकर माफिया मुक्त मुंबई आणि पाणी प्रकल्प (गारगाई , पिंजाळ) पूर्ण करणे. पुढील पाच वर्षे पाणी दरवाढीस स्थगिती दिल्यामुळे उत्पन्नात रु. एक ते दोन हजार कोटी प्रति वर्ष कमतरता येईल. पाच वर्षांत रु. पाच ते दहा हजार कोटी कमतरता. त्यात पाणीपुरवठा प्रकल्पांसाठी अतिरिक्त खर्च. मुंबई मनपाच्या उत्पन्नाचे मुख्य स्रोत मालमत्ता कर आणि पाणी कर आहेत. पाच वर्षे पाणी दरवाढीस स्थगिती दिल्यास इतर स्रोतांतून ही कमतरता भरून काढावी लागेल, मुंबईत पाणीटंचाई ही मोठी समस्या आहे. गेल्या वर्षी पाणीपुरवठ्यात १५% कमतरता होती. जर राखीव निधी कमी होत असेल, तर नवीन प्रकल्प कसे पूर्ण होतील? क्लायमेट कृती आराखडा प्लॅन आणि पर्यावरण सुधारणा करणार असे वचन भाजपने दिले आहे. रु.१७ हजार कोटींचा क्लायमेट कृती आराखडा प्लॅन, खड्डेमुक्त रस्त्यांची मुंबई (रस्ते काँक्रीटीकरण), शून्य कचरा वॉर्ड, हरित मुंबई आदी आश्वासने दिली आहेत. यासाठी रु.१७ हजार कोटी (पाच वर्षांसाठी), दरवर्षी रु. तीन ते चार हजार कोटी लागतील. यात पावसाळ्यात मुंबईची तुंबई होऊ नये म्हणून योजना, वीज निर्मिती आणि कचरा निर्मूलन समाविष्ट असेल. मुंबई मनपाच्या २०२५-२६ बजेटमध्ये पर्यावरण संबंधी खर्च रु.१७ हजार ०६७ कोटी (भांडवली) आणि रु.३ हजार २६९ कोटी (महसुली) आहे, पण प्रत्यक्ष अंमलबजावणी केवळ ४०% प्रकल्प पूर्ण झाले आहेत. झोपडपट्टीमुक्त मुंबई आणि गृहप्रकल्प, पाच वर्षांत झोपडीमुक्त आणि पागडीमुक्त मुंबई, ४० लाख परवडणारी घरे, धारावी पुनर्वसन आणि विस्तार अशी वचने दिली आहेत. मुंबई मनपाच्या वचनबद्ध दायित्वामध्ये आधीच रु.८८ हजार कोटी रस्ते/ब्रिजेससाठी. त्यात मुंबईत ४०% लोकसंख्या झोपडपट्ट्यांत राहते आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प गेल्या दहा वर्षांत केवळ २०% यशस्वी झाले. महिलांसाठी आर्थिक योजना आणि तंत्रज्ञान वापर करताना लाडकी बहीण योजना विस्तार (रु. ५० लाखांपर्यंत व्याजमुक्त कर्ज), मुंबई डिजिटल सखी (एआय/कोडिंग कोर्स), एआय वापरून अवैध स्थलांतरित ओळखणे आदी बाता मारल्या आहेत. यासाठी एक ते पाच हजार कोटी (वार्षिक कर्ज/योजना), एआय प्रोजेक्ट्ससाठी रु.१००-५०० कोटी उभे करावे लागतील. हे वचन महिलांच्या सक्षमीकरणावर आहे, पण मुंबई मनपाच्या महसुली खर्चात आरोग्य आणि शिक्षणासाठी आधीच निधी कमी पडत आहे (रु.७ हजार ३८० कोटी आरोग्य). मग मुंबई मनपा स्वतंत्र निधी कसा उभारेल? अवैध स्थलांतरित ओळखणे हे राजकीय आहे, पण त्याची अंमलबजावणी कायद्याच्या विरोधात जाऊ शकते.

आर्थिक स्थिती आणि आव्हाने

मुंबई मनपाचे बजेट अनेक राज्यांपेक्षा (गोवा, अरुणाचल, सिक्कीम) मोठे आहे, पण खचार्ची पद्धत पायाभूत सुविधांवर अधिक आहे. भांडवली खर्च ५८% आहे, ज्यात रस्ते रु.३ हजार ३६५ कोटी, पूल रु.२ हजार ९४० कोटी, सांडपाणी रु.३ हजार ७६७ कोटी. पण प्रभाग स्तरावर केवळ १४-२४% बजेट जाते, ज्यामुळे दैनंदिन सेवा (स्वच्छता, पाणी) प्रभावित होतात. ठेवी रु.८० हजार-८१ हजार ७७४ कोटी आहेत, पण गेल्या वर्षांत घट झाली. त्यामुळे तूट येण्याची शक्यता आहे आणि मुंबई मनपा पहिल्यांदाच म्युनिसिपल बॉण्ड्स जारी करणार आहे. महायुतीच्या वचनांसाठी पाच वर्षांत रु.१-१.५ लाख कोटी अतिरिक्त तरतूद लागेल. पण वचनबद्ध दायित्व रु.२.३२ लाख कोटी आहेत. सबसिडी (बेस्ट, पाणी) मुळे रिझर्व्ह आणखी कमी होतील. नवीन महापौर रितू तावडे ''सेवक म्हणून काम करेन'' म्हणतात, पण पारदर्शकता कशी राहील? मागील प्रशासक राजवटीत (४ वर्ष) मुंबई मनपाने मोठ्या प्रकल्पावर लक्ष केंद्रित केलं, पण सामान्य मुंबईकरांना फायदा कमी झाला. मार्च २०२२ ते जानेवारी २०२६ या सुमारे चार वर्षाच्या प्रशासकीय राजवटीत मुंबई मनपाच्या पैशांची मोठ्या प्रमाणात उधळपट्टी झाली. २०२१-२२ मध्ये मुंबई मनपाचा राखीव निधी रु.९१ हजार ६९० कोटी इतका होता. २०२१-२२ ते २०२४-२५ पर्यंत त्यात रु.१२ हजार १९२ कोटींची घट झाली. २०२५-२६ अर्थसंकल्पामध्ये राखीव निधी रु.८१ हजार ७७४ कोटी दाखवला, पण त्यानंतर आणखी रु. दोन हजार कोटी कमी झाले. २०२५ अखेर रु.७९ हजार ४९८ कोटींपर्यंत राखीव निधी खाली आला. मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पासाठी या ठेवी मोडल्या असे सांगण्यात आले. ज्यात कोस्टल रोड, गोरेगाव-मुलुंड लिंक रोड, एमएमआरडीएला निधी वळवणे, सांडपाणी प्रक्रिया करण्यासाठी निधी वापरणे, अशी कारणे देण्यात आली.

महापालिकेत ठाकरेंची सत्ता आली असती तर आधी श्वेतपत्रिका काढायला लावणार होते, मात्र आता ती शक्यता धुसर आहे. भाजपची वचने महत्त्वाकांक्षी आहेत, पण मुंबई मनपाच्या आर्थिक दबावात ती पूर्ण होण्याची शक्यता कमी दिसते. मुंबईकरांनी सतर्क राहावे. विरोधक म्हणून ठाकरेंचे अनुभवी पाहारेकरी लक्ष ठेवून असतीलच. सामान्य मुंबईकरांना विसरशील खास मला..म्हणण्याची वेळ येणार आहे हे मात्र निश्चित!!

पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार,३ मार्च २०२६ ते ९ मार्च २०२६

पोलिसांची सिनेस्टाईल कारवाई... तस्करांच्या मुसक्या आवळल्या, नागपुरात ५०५ किलोंचा गांजा जप्त

नागपूर। शहरात अंमली पदार्थ तस्करीविरोधात मोठी आणि धडाकेबाज कारवाई करत नागपूर पोलीस अंतर्गत कार्यरत अँटी नारकोटिक्स टास्क फोर्सने तब्बल ५०५ किलो गांजा जप्त केला आहे. मौदा तालुक्यातील माथनी टोल प्लाझाजवळ सापळा रचून एका ट्रकमधून ही मोठी खेप पकडण्यात आली. या प्रकरणी ट्रक चालकाला अटक करण्यात आली असून, ओडिशाहून नागपूरमध्ये चोरट्या मार्गाने गांजा आणला जात असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे अँटी नारकोटिक्स टास्क फोर्सच्या विशेष पथकाने मौदा येथील माथनी टोल नाक्यावर कारवाईची तयारी केली. मोबाईल लोकेशन ट्रॅकिंगच्या सहाय्याने संशयित ट्रकची हालचाल लक्षात घेण्यात आली होती. संबंधित ट्रक ओडिशामधून नागपूरच्या दिशेने येत असल्याची खात्री पटताच पोलिसांनी टोल प्लाझाजवळ सापळा रचला आणि ट्रक अडवला. ट्रकची कसून झडती घेतली असता त्यामध्ये मालवाहतुकीच्या आड लपवून ठेवलेले सुमारे ५०५ किलो गांजा आढळून आला. पोलिसांनी



त्वरित संपूर्ण माल जप्त करून ट्रक चालकाला ताब्यात घेतले. जप्त करण्यात आलेल्या गांजाची बाजारातील किंमत कोट्यवधी रुपयांच्या घरात असल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या कारवाईपूर्वी पोलिसांनी झिंगाबाई टाकळी परिसरात छापा टाकून अब्दुल वहीद उर्फ 'खोका' या कुख्यात ड्रग्ज तस्कराला अटक केली होती. आरोपी आपल्या सासरच्या घरातून गांजा तस्करीचे जाळे चालवत असल्याचे उघड झाले. त्याच्या घरातून सुमारे ७५ किलो गांजा हस्तगत करण्यात आला होता. या दोन्ही कारवायांमुळे नागपूरमध्ये सक्रिय असलेल्या मोठ्या अंमली पदार्थ रॅकेटचा पदार्फाश झाला आहे. चौकशीदरम्यान अब्दुल वहीदच्या मोबाईलमधील एका संशयास्पद क्रमांकाचे लोकेशन ओडिशामध्ये असल्याचे आढळले. तो क्रमांक नागपूरकडे येत असल्याची माहिती तांत्रिक विश्लेषणातून मिळाली. त्याच आधारे पोलिसांनी मौदा टोल नाक्यावर ट्रक पकडण्याची योजना आखली आणि ही मोठी खेप जप्त करण्यात यश मिळवले. सध्या अटक करण्यात आलेल्या ट्रक चालकाची कसून चौकशी सुरू असून, या आंतरराज्य गांजा तस्करी टोळीमध्ये आणखी कोणकोण सहभागी आहेत? याचा शोध घेतला जात आहे. ओडिशा आणि महाराष्ट्रातील संबंधित संपर्कांची माहिती गोळा केली जात आहे. या प्रकरणात आणखी अटक होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. नागपूरमध्ये वाढत्या अंमली पदार्थांच्या तस्करीवर आळा घालण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

लंडन ते हैद्राबाद विमानात तांत्रिक बिघाड
१६९ प्रवाशांचा जीव टांगणीला



GPS बिघाड; 169 प्रवासी सुरक्षित

नागपूर। ब्रिटिश एअरवेज बोईंग ७८७ हा विमान लंडनहुन हैद्राबादला येत होते. या विमानाची डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहाटे आपत्कालीन लँडिंग करण्यात आली. त्यात १६९ प्रवासी प्रवास करत होते. विमानात तांत्रिक विघड झाल्याने ब्रिटिश एअरवेज कंपनीचे विमानाची आपत्कालीन लँडिंग नागपूर मध्ये करण्यात आलं, यामुळे १६९ प्रवाशांचे जीव भांड्यात पडला. आपत्कालीन परिस्थितीत वैमानिकाने घेतलेल्या या निर्णयामुळेच १६९ प्रवाशांचे प्राण हे वाचू शकले आहेत. सर्व प्रवासी सुखरूप असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

विमानात तांत्रिक बिघाडही होता शिवाय दरम्यान हैद्राबाद यामध्ये खराब हवामानामुळे विमानाला लँडिंगची परवानगी नाकारण्यात आली त्यामुळे पयार्यी व्यवस्था म्हणून नागपूर विमानतळावर विमान उतरवण्याचा निर्णय घेण्यात आला . पहाटे साडे पाचच्या सुमारास विमान नागपूर विमानतळावर सुरक्षितपणे उतरले आपत्कालीन लँडिंगनंतर विमानाची तपासणी करण्यात आली असून प्रवाशांना आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या आधी काल रात्री रांची मध्ये नुकताच एअर ॲम्ब्युलन्सचा अपघात झाला. काही दिवसांपूर्वी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री यांचे निधन झाले, विमानांच्या वारंवार घडणाऱ्या या घटनांमुळे विमान प्रवासाचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

मुंबईत देखील एका हेलीकॉप्टरचा अपघात झाला आहे. वैमानिकाने तत्परता दाखवून समुद्रात सुरक्षित लँडिंग केल्याने मोठा अनर्थ टळला आहे.

ठाण्यात हाय-प्रोफाइल सेक्स रॅकेटचा पर्दाफाश... अभिनेत्रीला अटक, एजंट म्हणून करत होती काम



नागपूर। ठाणे शहरात मानवी तस्करीविरोधात मोठी कारवाई करण्यात आली आहे. ठाणे अँटी-ह्युमन ट्रॅफिकिंग युनिटने वागळे इस्टेट परिसरातील एका हॉटेलमध्ये सुरू असलेला कथित देहविक्री रॅकेट उद्ध्वस्त केल्याचा दावा केला आहे. या कारवाईत बिहारमधील मूळ रहिवासी असलेल्या एका अभिनेत्रीला अटक करण्यात आली.

कायदेशीर कारवाई

या प्रकरणी वागळे इस्टेट पोलीस ठाण्यात अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. "पीडितांची सुटका हा आमचा प्राधान्यक्रम आहे. या रॅकेटशी संबंधित इतर साथीदार आणि संभाव्य पीडितांचा शोध घेतला जात आहे," अशी माहिती ठाणे अल्पवयीन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. सुटका करण्यात आलेल्या महिलांना पुनर्वसन केंद्रात पाठवण्यात आले असून, या रॅकेटच्या आर्थिक आणि लॉजिस्टिक नेटवर्कचा सखोल तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

सापळा रचून छापा

स्थानिक हॉटेलमध्ये बेकायदेशीर प्रकार सुरू असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर अलळव पथकाने नियोजनबद्ध सापळा रचला. छाप्यात दोन महिलांची सुटका करण्यात आली. त्यांना देहविक्रीसाठी शहरात आणल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. मुख्य आरोपी असलेल्या अभिनेत्रीची ओळख तपासाच्या दृष्टीने अजून जाहीर करण्यात आली नाही.

आर्थिक व्यवहाराचा तपास

प्राथमिक चौकशीत मनोरंजन क्षेत्रात अनिश्चितता आणि नियमित कामाचा अभाव यामुळे संबंधित अभिनेत्री या रॅकेटमध्ये एजंट म्हणून काम करत असल्याचे समोर आले आहे.

प्रत्येक व्यवहारामागे ती सुमारे १५,००० रुपयांचे कमिशन घेत असल्याचा आरोप आहे. उद्योगातील ओळखींचा वापर करून आर्थिक अडचणीत असलेल्या महिलांना आमिष दाखवल्याची माहिती तपासात उघड झाली आहे.

३० किमी पाठलाग करून ठोकल्या बेड्या, ३० लाखांचे सोने जप्त

नाशिक, नाशिकच्या अंबड पोलिसांनी संशयितांचा तब्बल ओझरपर्यंत ३० किलोमीटर पाठलाग करून, पोलीस असल्याची बतावणी करत नागरिकांना लुटणाऱ्या दोन सराईतांना सिनेस्टाईल अटक केली आहे. नाशिकच्या अंबड पोलीस ठाण्यातील कॉन्स्टेबल मयूर पवार यांनी गेल्या २ वर्षांपासून शहरात घडत असलेल्या 'पोलीस बतावणी करून नागरिकांची लूट' या प्रकरणांचा आणि त्याबाबतच्या उउळश फुटेजचा सखोल अभ्यास केला होता.

पाथर्डी फाटा ते ओझर थरारक पाठलाग

शहराच्या वेगवेगळ्या भागात गेल्या अनेक दिवसांपासून पोलीस असल्याची बतावणी करून नागरिकांची लूट केली जात होती. अनेकांचे सोने या चोरट्यांनी लुटल्याच्या घटना समोर आल्या होत्या. पाथर्डी फाटा परिसरात पोलीस कॉन्स्टेबल मयूर पवार पेट्रोलिंग करत असताना त्यांना दोन संशयितांवर संशय बळावला. त्यांनी वरिष्ठांच्या परवानगीनुसार त्यांचा पाठलाग सुरू केला. हा सर्व थरार सिनेमातील एखाद्या दृश्याप्रमाणे मुंबई-आग्रा हायवेवर सुरू होता. अखेर अंबड पोलिसांनी या दोघा सराईतांना ओझर येथे अडवले. या दरम्यान संशयित आणि पोलीस यांच्यात झटापटही झाली, मात्र पोलिसांनी शिताफीने दोघांना अटक केली.

तोतया पोलिसांची टोळी गजाआड...



गुन्ह्यांची कबुली आणि मुद्देमाल जप्त

अमजद अली अकबर अली आणि फैयाज इम्तियाज अन्सारी (रा. भिवंडी) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत. पोलिसी खाक्या दाखवल्यानंतर दोन्ही सराईतांनी लुटीची पद्धत आणि केलेल्या गुन्ह्यांची उकल केली. या दोघांनी नाशिक शहर परिसरात ४२, नाशिक ग्रामीणमध्ये १०, धुळ्यात १० आणि कर्नाटक राज्यात १ असे पोलीस बतावणी करून लूट केल्याच्या गुन्ह्यांची कबुली दिली. त्यांच्याकडून पोलिसांनी १० गुन्ह्यांमधील तब्बल २० तोळे (२०० ग्रॅम) सोने, असा एकूण ३० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

गुंगारा देण्याची पद्धत

पोलिसांकडून त्यांच्या आणखी ४ साथीदारांची माहिती समोर आली असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. अटक केलेल्या सराईतांकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. या आरोपींवर 'मोक्का' अंतर्गत कारवाई करण्याची तयारी सुरू आहे. ताब्यात घेण्यात आलेले सराईत शहरात गुन्हे करून मालेगाव येथील गजबजलेल्या भागात वास्तव्यास राहत होते. शहरातून गुन्हे केल्यानंतर ते मालेगाव येथील भाडेतत्त्वावर घेतलेल्या घरात जात आणि तिथे वेशभूषा बदलून पुन्हा मुंबईकडे रवाना होत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

मोठ्या टोळीचा संशय

येत्या काळात या ताब्यात घेण्यात आलेल्या संशयितांकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे. यामागे एखादी मोठी टोळी सक्रिय असावी, असा संशय पोलिसांना असून त्या दिशेने आता नाशिक पोलीस अधिक तपास करत आहेत.

अवकाळी पावसाने शेती पिकांचे मोठे नुकसान
आंब्याच्या बागांनाही अवकाळीचा फटका



बीड। बीड जिल्ह्यात काही ठिकाणी अवकाळी पावसाच्या सरी, गारा कोसळल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. ऐन काढणीच्या टप्प्यावर आलेली गहू, हरभरा यासह अन्य रब्बी पिके भिजली. अचानक बदललेल्या हवामानामुळे शेतकऱ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

मागील दोन-तीन दिवसांपासून ढगाळ वातावरण कायम असून त्याचा थेट परिणाम शेतशिवारातील बहरलेल्या रब्बी पिकांवर दिसून येत आहे.

गहू, ज्वारी, कांदा आणि हरभरा या पिकांवर किडी, अळी व विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. परिणामी उत्पादनावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढली आहे. काही ठिकाणी आंब्याच्या बागांनाही फटका बसला असून मोहोर गळून पडला आहे.

अंबाजोगाई तालुक्यातील पूस परिसरासह काही गावांमध्ये अवकाळी पावसाने हजेरी लावली. बीड शहर व परिसरातही पावसाच्या सरी बरसल्या. या पावसामुळे काढणीला आलेला गहू व हरभरा भिजल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान आहे. मागील पाच वर्षांपासून फेब्रुवारी अखेर व मार्चच्या पहिल्या आठवड्यात अवकाळी पाऊस व गारपिटीच्या घटना घडताना दिसत असून, याच काळात काढणीस आलेली पिके मोठ्या प्रमाणात बाधित होत आहेत. यंदा माजलगाव धरण भरलेले असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात रब्बी हंगामाची पेरणी केली होती.

हरभरा गहू समवेत ज्वारी पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. प्रशासनाने तात्काळ पंचनामे करत मदत जाहीर करावी अशी मागणी पुढे आली आहे मशागतीसाठी खर्च करून जोपासलेली पिके अवकाळी पावसाने उद्ध्वस्त झाली असून शेतकरी हतबल झाला आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी प्रशासनाकडे करत आहेत.

ठळक वैशिष्ट्ये

- दोन सत्रांत सेवा : सकाळी मुंबईला जाऊन कामे पूर्ण करून रात्री कोल्हापुरात परतण्याची सुवर्णसंधी.
- नवी मुंबई कनेक्टिव्हिटी : ही सेवा थेट नवी मुंबई विमानतळावरून कार्यान्वित होणार आहे.
- तिकीट दर : या प्रवासाचे सुरुवातीचे तिकीट दर ७,६०० रुपये इतके असणार आहेत.
- विकासाला चालना : कोल्हापूर विमानतळावर नवीन टर्मिनसचे काम सुरू असतानाच ही सेवा सुरू झाल्याने पर्यटनाला आणि स्थानिक उद्योजकांना मोठा फायदा होणार आहे.

अशा असतील फेऱ्या

- सकाळची फेरी : नवी मुंबई सकाळी ८:०० ते कोल्हापूर सकाळी ९:१५ वाजता.
- कोल्हापूर सकाळी ९:३५ ते नवी मुंबई सकाळी १०:३५
- संध्याकाळची फेरी : नवी मुंबई संध्याकाळी ७:२० ते कोल्हापूर रात्री ८:३० वाजता.
- कोल्हापूर रात्री ८:५० ते नवी मुंबई ते रात्री ९:५० वाजता

२९ मार्चपासून कोल्हापूर ते नवी मुंबई 'डेली' विमानसेवा
सकाळी मुंबईला जाऊन संध्याकाळी येता येणार

कोल्हापूर। कोल्हापूरच्या उद्योग, व्यापार आणि पर्यटन क्षेत्राला मोठी गती देणारी बातमी समोर आली आहे. २९ मार्चपासून कोल्हापूर ते नवी मुंबई मार्गावर 'इंडिगो' कंपनीची विमानसेवा आठवड्यातील सातही दिवस सुरू होत आहे. विशेष म्हणजे ही सेवा सकाळी आणि संध्याकाळी अशा दोन सत्रांत उपलब्ध होणार असल्याने प्रवाशांचा मोठा वेळ वाचणार आहे. कोल्हापूरकरांना आता



मुंबईतील आपली कामे आटोपून त्याच दिवशी परतणे शक्य होणार आहे. या नवीन विमानसेवेमुळे कोल्हापूर आणि मुंबईतील अंतर केवळ तासाभराचे उरले असून, पश्चिम महाराष्ट्रातील प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. खासदार धनंजय महाडिक यांसाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता.

"कोल्हापूरकरांची ही अनेक वर्षांपासूनची मागणी होती. सोयीस्कर वेळेतील या विमानसेवेमुळे मुंबई-कोल्हापूर प्रवास अधिक सुखकर होईल आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात भर पडेल."

- धनंजय महाडिक, खासदार

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील अभूतपूर्व वाहतूककोंडी
वाहनचालकांना मिळणार ५.१६ कोटींचा टोल परतावा

मुंबई। मुंबई-पुणे द्रूतगती महामार्गावर गॅस टँकर उलटल्याने निर्माण झालेल्या प्रचंड वाहतूककोंडीत अडकलेल्या एक लाखांहून अधिक वाहनधारकांना एकूण ५.१६ कोटी रुपयांचा टोल परतावा देण्यात येणार असल्याची माहिती 'एमएसआरडीसी'च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी रविवारी दिली.

३ फेब्रुवारी रोजी खोपोली परिसरात द्रुतगती मार्गावर गॅस टँकर उलटल्याने ३३ तास वाहतूक ठप्प झाली होती. अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. त्यामुळे वाहनधारक आणि प्रवाशांना पाणी, अन्न आणि इतर मूलभूत सुविधांच्या टंचाईचा सामना करावा लागला. अपघातानंतर प्रशासनाने तत्काळ टोल वसुली स्थगित करण्याचे आदेश दिले होते. मात्र, तोपर्यंत अनेक वाहनधारकांच्या 'फास्टॅग' खात्यांमधून टोलची रक्कम वजा करण्यात आली होती.

'टोल वसुली थांबवण्याचे आदेश दिल्यानंतर वाहनधारकांकडून वसूल झालेली संपूर्ण रक्कम परत



करण्याचा निर्णय आता घेण्यात आला आहे. ५.१६ कोटी रुपयांचा परतावा 'एमएसआरडीसी'कडून परत देण्याची प्रक्रिया राबवली जाईल. ही रक्कम पुढील काही दिवसांत संबंधित वाहनधारकांच्या 'फास्टॅग' खात्यात थेट जमा केली जाईल,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या परताव्यामध्ये दोन्ही मार्गावरील वसूल केलेल्या टोलचा समावेश असून, टोल ऑपरेटरला 'फास्टॅग' व्यवहारांची सविस्तर माहिती सादर करण्यास सांगण्यात आले आहे, असे त्यांनी नमूद केले.

बांधकाम प्रकल्पांमुळे ठाण्याची हवा प्रदूषित... २८ ठिकाणी नियमभंग, ५.२५ लाखांचा दंड

ठाणे। ठाणे शहरात मोठ्या प्रमाणात सुरू असलेल्या बांधकाम प्रकल्पांमुळे हवा प्रदूषणाच्या नियमांची अंमलबजावणी होत नसल्याचे चित्र समोर आले आहे. अनेक बांधकामस्थळांवर आवश्यक उपाययोजना न केल्याने शहरातील हवा प्रदूषित होत असून नागरिकांना श्वास घेण्यास त्रास होत असल्याच्या तक्रारी वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

सध्या ठाणे शहराची हवा 'मध्यम प्रदूषित' गटात मोडत असून, महापालिकेकडून विविध उपाययोजना करूनही प्रदूषणात अपेक्षित घट होताना दिसत नाही. विशेषतः सकाळच्या वेळेत हवेची गुणवत्ता आणखी खालावत असल्याचे निरीक्षण आहे. हवेतील प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिकेच्या माध्यमातून शहरात विविध ठिकाणी मिस्ट



स्प्रे यंत्रणा बसविण्यात आली असून अन्य उपाययोजनाही राबविण्यात येत आहेत. मात्र, त्याचा प्रभाव मर्यादित असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर ठाणे महानगरपालिकाच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने १ ते २२ जानेवारी या कालावधीत शहरातील सुरू असलेल्या ३३ बांधकामस्थळांची तपासणी केली. यामध्ये २८ ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले संबंधित बांधकाम असून व्यावसायिकांना नोटीस बजावण्यात आल्या आहेत. काहींवर थेट दंडात्मक कारवाई - करण्यात आली असून आतापर्यंत - एकूण ५ लाख २५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. दरम्यान, बांधकामस्थळांवर काही हवेतील प्रदूषणाचे प्रमाण मोजण्यासाठी यंत्रणा तसेच मिस्ट स्प्रे बसविण्यात - आले असले तरी शहरातील हवा - अद्याप मध्यम प्रदूषित गटातच - मोडत आहे. शहरात वाढत असलेली - वाहनसंख्या हे देखील प्रदूषणाचे एक प्रमुख कारण ठरत आहे. सकाळ, दुपार आणि सायंकाळी शहरातील विविध रस्त्यांवर वाहतूककोंडी होत असून त्याचा परिणाम हवेच्या गुणवत्तेवर होत आहे. मागील दोन आठवड्यांपासून शहरातील विविध खासगी दवाखान्यांमध्ये दररोज ५० ते ६० रुग्ण सर्दी, खोकला आणि तापाच्या तक्रारींसह उपचारासाठी येत असल्याची माहिती समोर आली आहे.

पायाभूत प्रकल्पांची प्रदूषणात भर

शहरात मेट्रोसह कोस्टल रोड, फ्री वे आणि बोरिवली टनेल यांसारख्या पायाभूत प्रकल्पांची कामे सुरू असल्यानेही प्रदूषणात भर पडत आहे. फेब्रुवारी महिन्यात करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार शहरातील हवेचा गुणवत्ता निदेर्शांक (अदक) सरासरी ११५ इतका नोंदविण्यात आला आहे. शाहू मार्केट, नौपाडा येथे अदक११२, वर्तक नगर परिसरात १२८, कोपरी प्रभाग कार्यालय परिसरात १२३, कासारवडवली येथे १०२ तर उपवन परिसरात १०९ इतका अदकनोंदविण्यात आला आहे. सध्या ठाणे शहर 'पिवळ्या' गटात मोडत असून या गटातील अदक १०१ ते २०० दरम्यान असतो.

तक्रारीसाठी हेल्पलाइन

हवा प्रदूषण रोखण्यासाठी महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत असून प्रदूषणासंदर्भातील तक्रारी नोंदविण्यासाठी हेल्पलाइन व व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. नागरिकांनी छायाचित्रांसह तक्रार नोंदवावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वेग मंदावला
कोंडी फोडण्यासाठी बोरघाटात तातडीची वाहतूक बदल व्यवस्था

मुंबई। मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर आज (दि.२४) दुपारी वाहतूक कोंडीमुळे अनेक प्रवासी सुमारे तीन- चार किलोमीटर लांब रांगेत अडकले होते, त्यामुळे महामार्ग प्रशासनाने तातडीची वाहतूक बदल व्यवस्था लागू केली आहे.

१५ मिनिटांचा वाहतूक ब्लॉक, अमृतांजन पूल ते दत्तवाडी दरम्यान सर्वाधिक कोंडी

सकाळपासूनच जड वाहतूक सुरू होती. अमृतांजन पुलापासून दत्तवाडीपर्यंत वाहनांची गती अत्यंत मंदावली. घाटातील तीव्र वळणे आणि काही वाहनांचे बिघाड यामुळे महत्त्वाचे



प्रवाशांना आवाहन

महामार्ग पोलीस युद्धपातळीवर वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न करत आहेत. प्रवाशांनी संयम बाळगावा, शक्य असल्यास प्रवास पुढे ढकलावा किंवा लोणावळा व खालापूर येथे काही वेळ थांबून पुढे जावे, असे आवाहन करण्यात आले आहे. वाहतूक पूर्णपणे सुरळीत झाल्याची अधिकृत माहिती मिळेपर्यंत पयार्यी नियोजन करण्याचा सल्ला प्रशासनाने दिला आहे.

ह्यापासिंग पॉइंटह्ण बंद पडले आणि कोंडी वाढत गेली.

कार्यालयीन कर्मचारी आणि लांब पल्ल्याचे प्रवासी अनेक किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगेत अडकून पडले. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता निर्माण होताच महामार्ग पोलिसांची पथके घटनास्थळी दाखल झाली.

कोंडी फोडण्यासाठी मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर १५ मिनिटांचा रणनीतिक वाहतूक ब्लॉक लागू करण्यात आला आहे. मुंबईकडे जाणारी वाहतूक तात्पुरती थांबवून त्या रस्त्यावरील अतिरिक्त क्षमतेचा वापर पुण्याकडे जाणाऱ्या वाहनांची रांग कमी करण्यासाठी केला जात आहे. कोंडीचा सर्वाधिक परिणाम पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर झाला आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com